■ RNI - MAHAMAR / 2012 /44140
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !

दैनिक
# महाराष्ट्र सम्राट

संपादक- चंद्रकांत भोईटे
रविवार दि. २० मार्च २०२२ । ■ वर्ष १० वे ■ अंक ३१९ वा ■ पाने ४ ■ ठाणे
किंमत 2 रु.

## नारायण राणेंना BMC ची दुसरी नोटीस

# आता थेट बंगल्यावर महापालिकेचा हातोडा पडणार ?



मुंबई – मुंबई महापालिकेने केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना दुसऱ्यांदा नोटीस पाठवली आहे. मुंबई महापालिकेच्या के वेस्ट विभागाकडून ही नोटीस बजावण्यात आली आहे. त्यामुळे राणेंच्या आधिश बंगल्यावर खरंच हातोडा पडणार का ? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जातोय. कारण १५ दिवसांत स्वत: अनधिकृत बांधकाम काढा, अन्यथा कारवाई करावी लागेल, अशी नोटीस बजावण्यात आली होती. अशीच नोटीस पुन्हा एकदा बजावण्यात आली आहे. विशेष म्हणजे दुसऱ्यांदा १५ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. त्यामुळे नारायण राणे यांच्या विरोधातील अडचणी वाढल्या आहे. राणेंच्या विरोधात ही कारवाई केली जाईल का की ते या प्रकरणी कोर्टात जाणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



नारायण राणे यांच्या मुंबईतील जुहू इथं आदिश नावाचा बंगला आहे. या बंगल्यात अनधिकृत बांधकाम झाल्याच्या अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यामुळे मुंबई पालिकेनं दोन वेळा राणेंच्या बंगल्याची पाहणी केली होती. त्यानंतर नारायण राणे यांच्या घराला मुंबई महापालिकेनं नोटीस बजावली होती.

### काय आहे प्रकरण ?

नारायण राणे यांच्या मुंबईतील जुहू इथ आदिश नावाचा बंगला आहे. या बंगल्याबाबत अनधिकृत बांधकाम झाल्याची तक्रार होती. तारा रोडवर उभारण्यात आलेल्या या बंगल्याच्या बांधकामांमुळे सीआरझेड नियमांचे उल्लंघन होत असल्याची तक्रार आहे. मुंबई महानगरपालिकेच्या के पश्चिम विभागाच्या बिल्डिंग प्रपोजल विभागाचं पथकाने १८ फेब्रुवारी रोजी नारायण राणे यांच्या अधिश बंगल्यात जाऊन तपासणी केली आणि नोटीसही बजावली. आरटीआय कार्यकर्ते संतोष दौंडकर यांनी या संदर्भात तक्रार केली होती.

माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष दौंडकर यांनी नारायण राणे यांच्या बंगल्यात अनधिकृत बांधकाम झाले असल्याची तक्रार यापूर्वीच मुंबई मनपाला केली होती. मात्र, आपल्या या तक्रारीनंतर कुठलीच कारवाई केली नसल्याचा आरोप संतोष दौंडकर यांनी केला होता. त्यानंतर आता मुंबई मनपाने नारायण राणे यांच्या बंगल्याची तपासणी करण्यासाठी नोटीस बजावली. मुंबई महानगरपालिका कायदा १८८८ अंतर्गत सेक्शन ४८८ नुसार बीएमसीने केंद्रीय मंत्री नारायण राणेंना ही नोटीस पाठवण्यात आली. संतोष दौंडकर यांनी आरोप केला आहे की, नारायण राणे यांच्या जुहू येथील अधिश बंगल्यात अनधिकृत बांधकाम झाले आहे. तसेच कोस्टर रेग्युलेशन झोन (सीआरझेड) Coastal Regulations Zone नियमांचे उल्लंघन करुन हा बंगला बांधण्यात आला असल्याची तक्रारही त्यांनी केली होती. सीआरझेड नियमांचे उल्लंघन करत समुद्रापासून ५० मीटर परिसरात हा बंगला बांधण्यात आला असल्याचंही संतोष दौंडकर यांनी म्हटलं आहे.

### सीबीएसईकडून बारावी टर्म १ परीक्षेचा निकाल जाहीर

... पान ३ वर

### आदर्श नगरसेवक विकास रेपाळे... विशेष लेख

... पान ४ वर



**नागराज मंजुळे ठाण्यात....**
गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी आज (रविवारी) झुंड या सिनेमाच्या स्पेशल शो चे केले आयोजन केले. त्याप्रसंगी नागराज मंजुळे ठाण्यात आले. त्याचे ताशा वाजवून स्वागत करण्यात आले. त्यांना पाहून रसिकांनी आनंद व्यक्त केला. (छाया – मनोज सिंह)










सभासद व्हा
....आणि
दररोज नोकऱ्यांची माहिती आपल्या मोबाईलवर थेट मिळवा
वार्षिक वर्गणी फक्त 450/-
संपर्क : 9892305888

## महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मुंबई

■ पदाचे नाव – मुख्य सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी
■ पद संख्या – ०२ जागा
■ शैक्षणिक पात्रता – शैक्षणिक पात्रता पदांच्या आवश्यकतेनुसार. (मूळ जाहिरात वाचावी.)
■ नोकरी ठिकाण – मुंबई
■ अर्ज पद्धती – ऑनलाईन (ई–मेल)
■ ई–मेल पत्ता – filmcitycaogmail.com
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – २५ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट - www.filmcitymumbai.org

## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा–मेट्रो), पुणे

■ पदाचे नाव – मुख्य प्रकल्प व्यवस्थापक, महाव्यवस्थापक, अतिरिक्त मुख्य महाव्यवस्थापक, सहमहाव्यवस्थापक, वरिष्ठ उपमुख्य प्रकल्प व्यवस्थापक, वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक, वरिष्ठ उपमुख्य प्रकल्प व्यवस्थापक, उपमहाव्यवस्थापक, व्यवस्थापक, सहायक व्यवस्थापक, अग्निशमन अधिकारी.
■ पद संख्या – ४० जागा
■ शैक्षणिक पात्रता – शैक्षणिक पात्रता पदांच्या आवश्यकतेनुसार आहे. (मूळ जाहिरात बघावी.)
■ नोकरी ठिकाण – पुणे
■ अर्ज पद्धती – ऑनलाईन
■ अर्जाची प्रत पाठवण्याचा पत्ता – महाव्यवस्थापक (HR) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. पहिला मजला, ओरियन बिल्डिंग, अर्जुन मनसुखानी मार्ग, समोर. सेंट मीरा कॉलेज, कोरेगाव पार्क, पुणे – ४११००१
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – २१ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट - www.punemetrorail.org

## उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद पटबंधारे विभाग

■ पदाचे नाव – शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता, मंडळ अधिकारी/ नायब तहसीलदार
■ पदसंख्या – ०५ जागा
■ शैक्षणिक पात्रता – - retired officer from WR Department (Refer PDF)
■ नोकरी ठिकाण – उस्मानाबाद
■ अर्ज पद्धती – ऑफलाईन
■ अर्ज करण्याचा पत्ता – कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – २१ मार्च २०२२
■ निवड प्रक्रिया – मुलाखत
■ मुलाखतीची तारीख – २३ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट - wrd.maharashtra.gov.in

## केंद्रीय विद्यालय औरंगाबाद

■ पदाचे नाव – PGT, TGT, PRT, डॉक्टर, नर्स, समुपदेशक, डेटा एंट्री ऑपरेटर (DEO), संगीत शिक्षक, क्रीडा प्रशिक्षक, संगणक प्रशिक्षक
■ शैक्षणिक पात्रता – शैक्षणिक पात्रता पदांच्या आवश्यकतेनुसार आहे. (मूळ जाहिरात बघावी.)
■ नोकरी ठिकाण – औरंगाबाद
■ निवड प्रक्रिया – मुलाखत
■ मुलाखतीचा पत्ता – केंद्रीय विद्यालय औरंगाबाद
■ मुलाखतीचा तारीख – १९ २१ मार्च २०२२ (पदांनुसार)
■ अधिकृत वेबसाईट - aurangabadcantt.kvs.ac.in

## इंस्टीट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी मुंबई

■ पदाचे नाव – संशोधन सहाय्यक, कनिष्ठ संशोधन सहकारी, वरिष्ठ संशोधन सहकारी, संशोधन सहयोगी, संशोधन सहकारी
■ पद संख्या – ०२+ जागा
■ शैक्षणिक पात्रता – शैक्षणिक पात्रता पदांच्या आवश्यकतेनुसार आहे. (मूळ जाहिरात बघावी.)
■ अर्ज पद्धती – ऑनलाईन (ई–मेल) / ऑफलाइन
■ ई–मेल पत्ता –
संशोधन सहाय्यक, संशोधन सहकारी - research.assistantstaff.ictmumbai.edu.in/ bn.thoratictmumbai.edu.in
संशोधन सहयोगी - recruitment.iocbictmumbai.edu.in
■ अर्ज करण्याचा पत्ता – AR संस्था कार्यालयात (SRF/ JRF)
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – १०, १५, २४ मार्च २०२२ (पदांनुसार)
■ अधिकृत वेबसाइट - www.ictmumbai.edu.in

## स्टेट बँक ऑफ इंडिया

■ पदाचे नाव – मुख्य माहिती अधिकारी, मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, उपमुख्य तंत्रज्ञान अधिकारी
■ पद संख्या – ०४ जागा
■ शैक्षणिक पात्रता – Bachelor or Master's degree in software engineering or relevant field (Refer PDF)
■ नोकरी ठिकाण – मुंबई
■ अर्ज शुल्क – SC/ ST/ PWD - Nill General/ EWS/ OBC - रु. ७५०/–
■ अर्ज पद्धती – ऑनलाईन
■ अर्ज सुरु होण्याची तारीख – ०४ मार्च २०२२
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – ३१ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट - sbi.co.in

## भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था नागपूर

■ पदाचे नाव – पदवीधर / तंत्रज्ञ प्रशिक्षणार्थी
■ पदसंख्या – ०७ जागा
■ शैक्षणिक पात्रता – Diploma in Engineering, Degree in respective discipline (Refer PDF)
■ नोकरी ठिकाण – नागपूर
■ अर्ज पद्धती – ऑफलाईन
■ अर्जाची प्रत वठवण्याचा पत्ता – इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूर S.No. १४०,१४१/१ मागे ब्र. शेषराव वानखडे शेतकरी सहकारी सूत गिरणी, गाव – वारंगा, मु.पो. – डोंगरगाव (बुटीबोरी), जिल्हा – नागपूर (महाराष्ट्र) – ४४११०८
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – २१ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट - iiitn.ac.in

## हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड

■ पदाचे नाव – मुख्य व्यवस्थापक/ उपमहाव्यवस्थापक, सहायक व्यवस्थापक / व्यवस्थापक, वरिष्ठ अधिकारी
■ पदसंख्या – २५ जागा
■ शैक्षणिक पात्रता – ME/ M.Tech/ Ph.D (मूळ जाहिरात बघावी.)
■ अर्ज शुल्क – UR, OBCNC आणि EWS – रु. ११८०/–
■ अर्ज पद्धत्ती – ऑनलाईन
■ अर्ज सुरु होण्याची तारीख – १४ मार्च २०२२
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – १८ एप्रिल २०२२
■ अधिकृत वेबसाईट - www.hindustanpetroleum.com

## राष्ट्रीय आरोग्य अभियान रत्नागिरी

■ पदाचे नाव – आरोग्य परिचारिका, आरोग्य सहाय्यिका (LVH)
■ पद संख्या – ०२ जागा
■ शैक्षणिक पात्रता – 12th/ GNM²/ B.Sc Nusring (Refer pdf)
■ वयोमर्यादा – ६५ वर्षे
■ वेतन श्रेणी – रु. २००००/–
■ अर्ज पद्धती – ऑफलाईन
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता – तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, तालुका रत्नागिरी, मा. जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जयस्तंभ, रत्नागिरी ४१५६१२
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – १९ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट - ratnagiri.gov.in

## राष्ट्रीय प्रजनन स्वास्थ्य अनुसंधान संस्थान

■ पदाचे नाव – प्रोजेक्ट असोसिएट–I, संशोधन अधिकारी (वैद्यकीय), संशोधन सहयोगी–III, सल्लागार अभियंता
■ पद संख्या – ०४ जागा
■ शैक्षणिक पात्रता – शैक्षणिक पात्रता पदांच्या आवश्यकतेनुसार. (मूळ जाहिरात वाचावी.)
■ नोकरी ठिकाण – मुंबई
■ वयोमर्यादा –सल्लागार अभियंता – ६५ वर्षे
इतर पदांसाठी – ३५ वर्षे
■ अर्ज पद्धती – ऑनलाईन/ ऑफलाईन
■ अर्ज करण्याचा पत्ता – NIRRCH प्रशासन (सल्लागार अभियंता)
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – २२ मार्च २०२२ (पदांनुसार)
■ अधिकृत वेबसाईट - www.nirrh.res.in

## रोगी कल्याण समिती

■ पदाचे नाव – न्यूरो–सर्जन, प्लास्टिक आणि पुनर्रचनात्मक सर्जन, नेफ्रोलॉजिस्ट, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट, चेस्ट फिजिशियन, कार्डिओलॉजिस्ट, रेडिओलॉजिस्ट, हेल्थ अँड केअर एक्झिक्युटिव्ह, लोअर डिव्हिजन क्लर्क, मल्टी टास्किंग स्टाफ
■ पद संख्या – ११ जागा
■ शैक्षणिक पात्रता – MD/ DNB/ DM² (Refer PDF)
■ नोकरी ठिकाण – सिल्वासा
■ वयोमर्यादा – ४५ वर्षे
■ अर्ज पद्धती – ऑफलाइन
■ अर्ज करण्याचा पत्ता – सदस्य सचिव कार्यालय (RKS), श्री विनोबा भावे सिव्हिल हॉस्पिटल, सिल्वासा – ३९६२३०
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – २२ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट – daman.nic.in

## केंद्रीय विद्यालय आर्मी एरिया, पुणे

■ पदाचे नाव – PGT, TGT, PRT, डॉक्टर, नर्स, समुपदेशक, क्रीडा प्रशिक्षक, योग शिक्षक, संगीत/नृत्य शिक्षक आणि कला व हस्तकला शिक्षक
■ शैक्षणिक पात्रता – शैक्षणिक पात्रता पदाच्या अवश्यकतेनुसार (मूळ जाहिरात वाचावी.)
■ निवड प्रक्रिया – मुलाखत
■ मुलाखतीचा पत्ता – दिलेल्या संबंधित पत्यावर
■ मुलाखतीची तारीख – १९, २१ व २२ मार्च २०२२ (पदांनुसार)
■ अधिकृत वेबसाईट – armyareapune.kvs.ac.in

## इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग फायनान्स

■ पदाचे नाव – सहाय्यक संचालक, उपसंचालक, संशोधन सहयोगी, संचालक
■ पद संख्या – ०६ जागा
■ शैक्षणिक पात्रता – शैक्षणिक पात्रता पदांच्या आवश्यकतेनुसार आहे. (मूळ जाहिरात बघावी.)
■ अर्ज पद्धती – ऑनलाईन
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – १५ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट – www.iibf.org.in

## आयडीबीआय बँक

■ पदाचे नाव – मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी, प्रमुख – शिक्षण आणि विकास
■ पद संख्या – ०२ जागा
■ शैक्षणिक पात्रता – Master's or Bachelor's degree in Engineering disciplines/ MBA (Refer PDF)
■ वयोमर्यादा – ४५ ते ५५ वर्षे
■ नोकरी ठिकाण – मुंबई
■ अर्ज पद्धती – ऑनलाईन (ई–मेल)
■ अर्ज करण्याचा ई–मेल पत्ता – recruitmentidbi.co.in
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – १६ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट – www.idbibank.in

## भारतीय लघु उद्योग विकास बँक

■ पदाचे नाव – सहाय्यक व्यवस्थापक
■ पद संख्या – १०० जागा
■ शैक्षणिक पात्रता – शैक्षणिक पात्रता पदांच्या आवश्यकतेनुसार आहे. (मूळ जाहिरात बघावी.)
■ अर्ज पद्धती – ऑनलाईन
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – २४ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट – www.sidbi.in

## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा–मेट्रो), पुणे

■ पदाचे नाव – मुख्य प्रकल्प व्यवस्थापक, महाव्यवस्थापक, अतिरिक्त मुख्य महाव्यवस्थापक, सहमहाव्यवस्थापक, वरिष्ठ उपमुख्य प्रकल्प व्यवस्थापक, वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक, वरिष्ठ उपमुख्य प्रकल्प व्यवस्थापक, उपमहाव्यवस्थापक, व्यवस्थापक, सहायक व्यवस्थापक, अग्निशमन अधिकारी.
■ पद संख्या – ४० जागा
■ शैक्षणिक पात्रता – पात्रता पदांच्या आवश्यकतेनुसार आहे.
■ अर्ज पद्धती – ऑनलाईन
■ अर्जाची प्रत पाठवण्याचा पत्ता – महाव्यवस्थापक (HR) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. पहिला मजला, ओरियन बिल्डिंग, अर्जुन मनसुखानी मार्ग, समोर. सेंट मीरा कॉलेज, कोरेगाव पार्क, पुणे – ४११ ००१
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – २१ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट – www.punemetrorail.org

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

■ पदाचे नाव – संचालक / प्राचार्य / प्रमुख
■ पद संख्या – ०१ जागा
■ शैक्षणिक पात्रता – First Class B.Pharm with Master's degree in Pharmacy (Refer PDF)
■ नोकरी ठिकाण – बुलढाणा
■ अर्ज पद्धती – ऑनलाईन (ई–मेल)
■ अर्ज पाठवण्याचा ई–मेल पत्ता – Icpbuldanagmail.com
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख –१५ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट– www.sgbau.ac.in

## होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र मुंबई

■ पदाचे नाव – प्रकल्प वैज्ञानिक सहाय्यक– बी, प्रकल्प सहाय्यक
■ पद संख्या – १० जागा
■ शैक्षणिक पात्रता – शैक्षणिक पात्रता पदांच्या आवश्यकतेनुसार आहे. (मूळ जाहिरात बघावी.)
■ वेतन श्रेणी –
प्रकल्प वैज्ञानिक सहाय्यक–इ – रु. ४८,५००/–
प्रकल्प सहाय्यक – रु. ३१,८००/–
■ निवड प्रक्रिया – मुलाखत
■ पत्ता – होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन, टी. आय. एफ. आर., व्ही. एन. पूर्व मार्ग, मानखुर्द, मुंबई – ४०००८८
■ मुलाखतीची तारीख – १५, १६, १७, २२, २३, २४, २९, ३० मार्च २०२२ (पदांनुसार)
■ अधिकृत वेबसाईट : www.hbcse.tifr.res.in

## शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

■ पदाचे नाव – वैधानिक लेखा परीक्षक
■ शैक्षणिक पात्रता – शैक्षणिक पात्रता पदांच्या आवश्यकतेनुसार. (मूळ जाहिरात वाचावी.)
■ अर्ज पद्धती – ऑफलाईन
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता – वित्त व लेखा अधिकारी शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – ३० मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट – www.unishivaji.ac.in

## मुख्यालय वेस्टर्न नेव्हल कमांड मुंबई

■ पदाचे नाव – फार्मासिस्ट, फायरमन, पेस्ट कंट्रोल वर्कर
■ पद संख्या – १२७ जागा
■ शैक्षणिक पात्रता – Matriculation Or equivalent (Refer PDF)
■ वयोमर्यादा – ५६ वर्षे
■ अर्ज पद्धती – ऑफलाइन
■ अर्ज पाठवण्याचा पत्ता – फ्लॅग ऑफिसर कमांडिंग–इन–चीफ, (SO "CP' साठी), मुख्यालय वेस्टर्न नेव्हल कमांड, बॅलाड पियर, टायगर गेट जवळ, मुंबई – ४००००१
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – २६ एप्रिल २०२२
■ अधिकृत वेबसाईट : indiannavy.nic.in

## मुख्यालय २ सिग्नल प्रशिक्षण केंद्र पणजी

■ पदाचे नाव – उपकरणे दुरुस्त करणारे आणि MTS (माळी)
■ पद संख्या – ०३ जागा
■ शैक्षणिक पात्रता – 10th pass (Refer PDF)
■ वयोमर्यादा – १८ ते २५ वर्षे
■ अर्ज पद्धती – ऑफलाईन
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता – कमांडंट, मुख्यालय २ सिग्नल प्रशिक्षण केंद्र, पणजी, गोवा
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख – २७ मार्च २०२२
■ अधिकृत वेबसाईट – joinindianarmy.nic.in

# कल्याण डोंबिवलीमधील भाई लोकांचा मुक्काम आता जेलमध्ये

कल्याण : वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी ठोस पाऊले उचलण्यास सुरू केली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या दोन गुंडाची जेल (गरळश्र)मध्ये रवानगी करण्यात आली आहे. आणखी पाच जणांवर ही कारवाई केली जाणार असल्याची माहिती कल्याणचे डीसीपी सचिन गुंजाळ यांनी दिली आहे. कल्याण डोंबिवलीत गेल्या काही दिवसांपासून मारामारी आणि इतर घटनांमध्ये वाढ झाली आहे. यामध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या तरुणांचा समावेश असल्याचं समोर आलं आहे. या गुंडांना आळा घालण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्त जयजित सिंग यांनी जिल्ह्यातील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीविरोधात ठोस कारवाई करण्याचे आदेश दिल आहेत. या पार्श्वभूमीवर कल्याणचे डीसीपी सचिन गुंजाळ यांनी गेल्या काही दिवसांपासून ही कारवाई सुरू केली आहे. गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या आरोपींची रवानगी आता थेट जेलमध्ये केली जात आहे.

## आरोपींविरोधात एमपीडीए अंतर्गत कारवाई

आरोपींविरोधात एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. कल्याण पूर्वेतील खडगोलवली परिसरात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आशिष पांडे विरोधात कारवाई करत कोळसेवाडी पोलिसांनी त्याची रवानगी पुण्यातील येरवडा जेलमध्ये केली आहे. मानपाडा पोलिसांनी देशमुख होम परिसरात राहणाऱ्या गुंड त्रिशांत साळवी याची रवानगी देखील जेलमध्ये केली आहे. एक वर्षासाठी या दोघांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. हे आरोपी एक वर्ष जेलमध्ये राहणार आहेत. आणखी पाच जणांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई केली जाणार आहे.

# बदलापूरमध्ये केंद्रीय मंत्र्याला शिवसैनिकांनी दाखविले काळे झेंडे

बदलापूर – केंद्रीय मंत्री कपिल पाटील हे बदलापूरमध्ये एका क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी येणार असल्याची माहिती मिळताच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी कपिल पाटील यांना काळे झेंडे दाखवत निषेध व्यक्त केला. पाटील हे बदलापुरात एका जिमखानाच्या दुसऱ्या टप्प्याच्या भूमिपूजनासाठी शनिवारी बदलापुरात आले होते. बदलापूरच्या हेंद्रेपडा परिसरामध्ये पालिकेच्यावतीने भव्य असे जिमखाना आणि क्रीडा संकुलाचे काम करण्यात आले आहे. याच कामांतर्गत जिमखानाच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाचे भूमिपूजन केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार होतो. त्याला विरोध दर्शविण्यासाठी शिवसेनेच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी हेंद्रेपाडा परिसरात कपिल पाटील यांना काळे झेंडे दाखवत निषेध व्यक्त केला. याची कुणकुण पोलीस प्रशासनाला आधीच लागल्याने पोलीस प्रशासनाने या ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवला होता. तसेच काळे झेंडे दाखवणाऱ्या आणि घोषणाबाजी करणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. माजी नगरसेवक राजन घोरपडे यांच्या संकल्पनेतून पालिका प्रशासनाच्या माध्यमातून या क्रीडा



मैदानाचे आणि जिमखान्याचे काम करण्यात आले होते. त्याच्या दुसऱ्या टप्प्याचे काम करण्यासाठी या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मात्र त्याच वेळी शिवसेनेने निषेध व्यक्त केल्याने या कार्यक्रमाला गालबोट लागले.

**वकील – डी. ओ. पांडे**

**जाहीर नोटिस**
**ठाणे येथील प्रथम वर्गीय न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र. ३०२७/२०१९

विजय ज्ञानेश्वर मटकर ... अर्जदार
वि.
मा. उप – निबंधक,
जन्म–मृत्यु विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे. ... सामनेवाले

सदर जाहीर नोटिसद्वारे आपणास सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदार यांच्या आई कै. इश्कबाई ज्ञानु मटकर यांचे दिनांक २३/०९/१९६४ रोजी ४/१४ नवीन पोलीस लाईन, ठाणे (प.) येथे राहते घरी निधन झाले असून काही कारणास्तव अर्जदार यांच्या आई यांच्या मृत्युची नोंद ही जन्म–मृत्यु विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे कार्यालयात तसेच कोणत्याही शासकीय व निमशासकीय कार्यालयात करण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी जन्म–मृत्यू अधिनियमाच्या कलम १३(३) प्रमाणे त्यांच्या आई कै. इश्कबाई ज्ञानु मटकर यांची सामनेवाले यांच्या जन्म–मृत्यू दफ्तरी मृत्युची नोंद करणेकामी सदरचा अर्ज हा मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.
तरी कै. इश्कबाई ज्ञानु मटकर यांच्या मृत्युच्या नोंदणी कामी जर कोणाचीही हरकत असल्यास किंवा कोणतीही तक्रार असल्यास सदर जाहीर नोटिस प्रसारित केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरुपात मा. न्यायालयात दाखल करावी तसेच सदर कालावधीच्या आत कोणाचीही हरकत आली नाही, तर अर्जदार यांच्या बाजूने आदेश पारित करण्यात येईल तसेच त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जणार नाही याची नोंद घ्यावी.
सदर जाहीर नोटिस आज दिनांक १७/०३/२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

हुकुमावरून
सही/–
सहा. अधीक्षक
प्रथम वर्गीय न्यायदंडाधिकारी, ठाणे

■ वर्ष १० वे
■ अंक ३१९ वा
■ पाने ४
■ ठाणे
■ RNI - MAHAMAR / 2012 /44140
■ Registered Postal Regd. THC /58 / 2021-2023

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !

तापमान २८° | सोने ५२,०४० | चांदी ६७,२०० | पान 3

सरकारी/खाजगी नोकरींच्या माहितीसाठी पान २ पहा | संपादक- चंद्रकांत भोईटे | अग्रलेख -एमआयएमशी युतीची चर्चा


## संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## एमआयएमशी युतीची चर्चा

गेल्या अडीच वर्षापासून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि काँग्रेस या तीन पक्षांच्या सरकारवर सातत्याने भाजपाकडून टीका केली जात असताना सरकार पडण्याचे मुहूर्त देखील वारंवार दिले जात आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात नवी सत्तासमीकरणे जुळण्याची चर्चा सुरू झाली असून एमआयएमने राष्ट्रवादी काँग्रेसला दिलेली ऑफर त्यासाठी कारणीभूत ठरली आहे. एक खासदार, २९ नगरसेवक, दोन आमदार असलेल्या एमआयएमची राष्ट्रवादीला असलेली ऑफर सध्या चर्चेत आली आहे. एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी अशी युती होण्याला दुजोरा दिला आहे. भाजपाला हरवण्यासाठी सर्वांनी एकत्र यायला हवे, असा नारा काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आलेल्या ममता बॅनर्जी यांच्यासोबतच शरद पवार यांनी देखील दिला होता. त्याच भूमिकेचा पुनरुच्चार करत एमआयएमनं राष्ट्रवादी काँग्रेसला युतीची ऑफर दिली आहे. खासदार जलाल यांनी म्हटले आहे कि, आमच्याशी राष्ट्रवादीने युती करावी. परंतु एमआयएमच्या या भूमिकेबद्दल महा विकास आघाडीतील तीनही पक्ष संभ्रमात पडले आहेत. एमआयएमशी युती करण्यापूर्वी, एमआयएम हा पक्ष जातीवादी असून तो एका विशिष्ठ धर्माचा पक्ष असल्याचे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे. तर एमआयएमने कट्टरवाद धोरणाला तिलांजली द्यावी आणि आमच्याशी युती करावी असे राष्ट्रवादीने म्हटले आहे. शिवसेनेने म्हटले आहे कि, एमआयएम हा जातीवादी विचारांचा पक्ष आहे. सध्या महा विकास आघाडीतील तीनही पक्षांनी एकत्र येत भाजपला विरोध करण्याचे ठरवले आहे. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटले आहे कि, तीनही पक्षांनी एकत्रितपणे निवडणूक लढली तर भाजपाला नेस्तनाबूत करू. याच राजकीय सूत्रावर सध्या महाराष्ट्रात विविध चर्चा सुरु झाली आहे. एमआयएमला आघाडीत सामील करून घेण्यास सर्वांचा विरोध दिसत असून खासदार इम्तियाज जलील यांनी राजीनामा देऊन राष्ट्रवादीत आल्यास त्यांचे स्वागत होईल, असे राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. भाजपाला हरवण्यासाठी एमआयएमने राष्ट्रवादी काँग्रेसला युतीची ऑफर दिली आहे. एमआयएमचे औरंगाबादचे खासदार इम्तियाज जलील यांची नुकतीच राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्यासोबत चर्चा झाली, या चर्चेत त्यांनी ही युतीची ऑफर दिली आहे. जलील यांच्या या ऑफरची सर्वत्र राजैय वर्तुळात चर्चा सुरु झाली आहे. अशातच मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले की, महाविकास आघाडीचे हे सरकार पाच वर्षे टिकणार आहे. २०२४मध्ये तिन्ही पक्ष एकत्र लढल्यास भाजपाने महाराष्ट्राची सत्ता विसरावी, असा टोला त्यांनी लगावला.महाविकास आघाडीतील २५ आमदार आमच्या संपर्कात असल्याचा दावा केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी केला होता, त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये काही आमदार नाराज आहेत का, असा प्रश्न विचारण्यात आला. यावर भुजबळ म्हणाले की, उद्धव ठाकरे, शरद पवार, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण आणि सोनिया गांधी यांच्या आघाडीचे सरकार निश्चितपणे पाच वर्षे टिकणार आहे. पाच वर्षानंतर हे तीन पक्ष एकत्रित लढले तर भाजपाने महाराष्ट्रातील सत्ता विसरायला हरकत नाही, असा टोला भुजबळांनी लगावला. एमआयएमच्या ऑफरवरून महाराष्ट्रात नवीन सत्तासमीकरणांची चर्चा सुरु झाली आहे. इम्तियाज जलील यांनी म्हटले आहे कि, काँग्रेसने आमच्याशी युती करण्यास हरकत नाही. कारण त्यांचे विचार पुरोगामी आहेत. परंतु काँग्रेसला एमआयएमची भूमिका जातीवादी वाटत आहे. अनेक वेळा असे होते कि, काँग्रेस किंवा राष्ट्रवादीचा उमेदवार भाजप विरोधात निवडणुकीला उभा राहिला तर एमआयएमचे उमेदवार मुस्लिम मते मिळवतात आणि काँग्रेस- राष्ट्रवादीला अपेक्षित पुरोगामी विचारांची मते न मिळाल्याने उमेदवार पराभूत होतात. एमआयएमचे उमेदवार जिथे निवडणुकीला उभे राहतात, तेथील काँग्रेस- राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा भाजपकडून पराभव होतो. याचाच अर्थ एमआयएमआ भाजपाची बी टीम मानले जाते. त्यामुळे एमआयएमची ऑफर स्वीकारावी का, असा संभ्रम काँग्रेस - राष्ट्रवादीच्या मनात निर्माण झाला आहे. अडीच वर्षापासून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आहे. हे सरकार पाडण्यासाठी विरोधी पक्ष भाजपकडून जोरदार प्रयत्न सुरु आहेत. दार आठवड्याला महा विकास आघाडी सरकार पडणार असे भाजपावाले सांगत असतात. परंतु त्यांना महा विकास आघाडी सरकार कोसळवणे जमलेले नाही. तीन पक्षांच्या सरकारवर सातत्याने भाजपाकडून टीका केली जात असताना सरकार पडण्याचे मुहूर्त देखील वारंवार दिले जात आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात नवी सत्तासमीकरणे जुळण्याची चर्चा सुरू झाली असून एमआयएमने राष्ट्रवादी काँग्रेसला दिलेली ऑफर त्यासाठी कारणीभूत ठरली आहे. एक खासदार, २९ नगरसेवक, दोन आमदार असलेल्या एमआयएमची राष्ट्रवादीला असलेली ऑफर सध्या चर्चेत आली आहे. भाजपाला हरवण्यासाठी सर्वांनी एकत्र यायला हवे, असा मतप्रवाह महाराष्ट्राबाहेरील नेत्यांकडून व्यक्त केला जात आहे.राष्ट्रवादी काँग्रेसलाच एमआयएमकडून इम्तियाज जलील यांनी आव्हान दिले आहे.आमच्यावर आरोप करण्यात येतात की भाजपा आमच्यामुळे जिंकते. त्यामुळे मी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भेटायला आले असता त्यांना ऑफर दिली आहे. एकदा हे संपवायचे असेल, तर तुम्ही आमच्यासोबत युती करायला तयार आहात का? त्यावर ते काही बोलले नाहीत. आता बघायचे आहे की त्यांना फक्त आरोप करायचे आहेत की त्यांना त्यांची भूमिका सिद्ध करायची आहे, असे इम्तियाज जलील म्हणाले आहेत. दरम्यान, यावेळी बोलताना जलील यांनी काँग्रेसला देखील युती करण्याचेआव्हान दिले आहे. आम्ही कुणालाही नको आहोत. फक्त मुस्लिमांची मते हवी आहेत. कशाला राष्ट्रवादी ? काँग्रेस स्वत:ला धर्मनिरपेक्ष मानतो. त्यांनाही मुस्लीम मते हवी आहेत. तर मग यावे काँग्रेसने, आपण युती करु, असे जलील म्हणाले.सर्वात जास्त कुणी देशाचे नुकसान करत असेल, तर ती भाजपा आहे. त्यांना पराभूत करण्यासाठी जे काही लागते, ते आम्ही करायला तयार आहोत. उत्तर प्रदेशातही सपा, बसपासोबत आम्ही बोलणी केली होती. पण त्यांना मुस्लिमांची मते हवी आहेत, पण एमआयएम पक्ष नको. म्हणून मी ही ऑफर दिली आहे, अशा शब्दांत जलील यांनी एमआयएमची भूमिका स्पष्ट केली आहे. जलील यांच्या भूमिकेवर आता महा विकास आघाडीचे नेते गांभीर्याने विचार करणार कि स्वस्थ बसणार हे लवकरच समजेल. एमआयएमच्या नेत्यांची वक्तव्ये पाहता, ती स्पष्ट आणि तेढ निर्माण करणारी आल्याचा आरोप नेहमीच होतो. काँग्रेसला एमआयएमशी युती करणे जड जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसनेही असा विचार केला आहे कि, एमआयएम या पक्षाशी युती करण्यापेक्षा त्या पक्षातील नेते राष्ट्रवादीत आले तर बरे होईल. एकूण एमआयएम या पक्षाशी युती करण्यास कोणी पुढे धजावेल, असे नाही.

# CBSE १२ वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) बारावीच्या टर्म - १ परीक्षा २०२१चा निकाल जाहीर केला आहे. सीबीएसई दहावी प्रमाणेच बारावीचेही विद्यार्थी आपल्या शाळेतून निकाल प्राप्त करतील. यावेळी सीबीएसईने अधिकृत वेबसाईटवर निकाल जाहीर केलेला नाही. यापूर्वी संकेतस्थळावर निकाल जाहीर होतील, अशी शक्यता वर्तवली जात होती. शाळा विद्यार्थ्यांचा निकाल डाऊनलोड करू शकते. लवकरच दहावी आणि बारावी टर्म १चे निकाल देखील अधिकृत वेबसाईटवर cbseresults.nic.in प्रसिद्ध केले जातील अशी अपेक्षा आहे.

बारावीचा निकाल शाळांकडे पाठवण्यास सुरुवात सीबीएसईकडून बारावीच्या टर्म १ परीक्षेचे निकाल शाळांकडे पाठवण्यास सुरुवात झाली आहे. टर्म १ परीक्षा आणि टर्म २ परीक्षेचा निकाल एकत्रितपणे मार्कशीटवर आगामी काळात जारी केले जातील. सीबीएसईकडून नव्या शिक्षण धोरणानुसार दहावी आणि बारावीच्या परीक्षा दोन टर्म घेण्यात आल्या होत्या. विद्यार्थी आपला निकाल/स्कोरकार्ड सीबीएसई अधिकृत संकेतस्थळावरुन cbse.gov.in, cbseresults.nic.in डाउनलोड करु शकतील. त्यासोबत डिजीलॉकर अप आणि संकेतस्थाळावरुनही digilocker.gov.in स्कोरकार्ड प्राप्त करु शकतील. दरम्यान, सीबीएसईने गेल्या आठवड्यात दहावी टर्म १ परीक्षेचा निकाल घोषीत केला होता. विद्यार्थ्यांचा निकाल शाळेत पाठवण्यात आला होता. शाळेकडून विद्यार्थ्यांना निकाल देण्यात आला होता. आता दहावीच्या विद्यार्थ्यांनाही शाळेतच निकाल मिळेल. येत्या २६ एप्रिलपासून दुसऱ्या टर्मसाठी होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक सीबीएसईने जाहीर केलं आहे. सकाळी १०.३० वाजता या परीक्षांची वेळ सुरू होणार आहे. दुसऱ्या टर्मचे नवीन वेळापत्रक सीबीएसईने त्यांच्या cbse.nic.in या अधिकृत वेबसाईटवर जाहीर केलं आहे. दुसऱ्या टर्ममध्ये विद्यार्थ्यांना ऑबजेक्टिव्ह आणि सबजेक्टिव्ह असे दोन प्रकारचे प्रश्न विचारण्यात येणार आहे. पहिल्या टर्ममधील परीक्षेत विद्यार्थ्यांना फक्त ऑब्जेक्टिव प्रश्न विचारण्यात आले होते. बोर्डाच्या परीक्षेसाठी सँपल पेपर पॅटर्न फॉलो करण्यात येणार आहे.



**दहावी टर्म १ चा निकाल जाहीर**

सीबीएसईने १२ मार्च रोजी १०वी टर्म-१चा निकाल जाहीर केला. परंतु, विद्यार्थी त्यांचे निकाल अधिकृत वेबसाईटवर पाहू शकणार नाहीत. अहवालानुसार, सीबीएसईने शाळांना मेलद्वारे हा निकाल पाठवला आहे. यासाठी विद्यार्थी त्यांच्या संबंधित शाळांशी संपर्क साधू शकतात आणि त्या ठिकाणी जाऊन त्यांचे स्कोअर कार्ड अर्थात गुणपत्रिका मिळवू शकतात. स्कोअर कार्डमध्ये विद्यार्थ्यांच्या विषयनिहाय गुणांचा तपशील असू शकतो. तर, शाळा अधिकारी अधिकृत शैक्षणिक मेल आयडीद्वारे हा निकाल पाहू शकतात. अधिकृत वेबसाईटवर निकाल जाहीर केल्यानंतर, विद्यार्थ्यांना त्यांचे गुण तपासता येतील.

## धुळवडीच्या ड्रिंक अँड ड्राइव्ह तपासणीचा राग





# पोलिसांच्या डोक्यात मारली वीट

### हल्ल्या प्रकरणी २ तरुण अटकेत

**ठाणे - होळी आणि धुळीवंदन निमित्त ठाणे शहर वाहतूक विभागाची मद्यपी वाहन चालकांवर दिवसभर कारवाईची विविध ठिकाणी मोहीम ठाणे वाहतूक पोलिसांच्या माध्यमातून सुरु होती. या कारवाईला शुक्रवारी संध्याकाळी गालबोट लागले. ड्रिंक अँड ड्राइव्ह तपासणीचा राग मनात धरून कारवाईनंतर मागून वाहतूक पोलिसांच्या डोक्यात वीट मारल्याचा प्रकार शुक्रवारी राबोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला. जखमी पोलिसाला उपचहरासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर या प्रकरणी दोघं आरोपीना अटक करण्यात आलेली आहे.**

अटक मुख्य आरोपी अनिल गुप्ता आणि आरोपी भगीरथ चव्हाण यांची ड्रिंक अँड ड्राइव्ह तपासणी राबोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कर्तव्यावर असलेल्या नागनाथ कांदे यांनी केली. त्यावेळी आरोपी अनिल गुप्ता यावर कलम १८५ नुसार तर सह आरोपी भगीरथ चव्हाण याच्यावर १८८ नुसारकारवाई करण्यात आली होती व त्यांना शनिवारी न्यायालय हजर होण्याचे पोलीसांनी आदेश दिले होते. सदरच्या कारवाईचा राग मनात धरून आरोपींची कारवाईनंतर कापूरबावडी ब्रिजखाली असलेल्या वाहतूक पोलीस नागनाथ कांदे यांच्या डोक्यात मागून आलेल्या मुख्य आरोपी अनिल गुप्ता याने वीट मारून हल्ला केला. या हल्ल्यात वाहतूक पोलीस नागनाथ कांदे हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. आरोपी अनिल आणि भगीरथ यांच्या विरोधात सरकारी कामात अडथळा आणि जीवघेणा हल्ला प्रकरणी राबोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या दोघांना पोलिसांनी अटक केली. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.



होळी आणि धुळीवंदन निमित्त ठाणे शहर वाहतूक विभागाची ड्रिंक अँड ड्राइव्ह कारवाई सुरु होती. या दोघे आरोपींपैकी भगीरथ वाहन चालवीत होता. आणि दुचाकीवर अनिल गुप्ता मागे बसला होता. त्यांच्यावर कारवाई केल्यानंतर रागाने वाहतूक पोलिसांच्या डोक्यात वीट मारली आणि नागनाथ कांदे हे जखमी झाले त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तर दोघांना अटक करून त्यांच्या विरोधात जीवे ठार मारण्याचा प्रयत्न आणि सरकारी कामात अडथळा प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

-बाळासाहेब पाटील
(उपायुक्त-ठाणे शहर वाहतूक विभाग )





## भाईंदरच्या जंजिरे धारावी किल्ल्याच्या संवर्धनासाठी एकूण १३ कोटीचा निधी उपलब्ध

**खासदार राजन विचारे यांच्या मागणीला यश**

भाईंदर - खासदार राजन विचारे यांनी भाईंदर पश्चिमेकडील उत्तन किनारपट्टीवरील चौक धारावी जंजिरे किल्ल्याची पाहणी नुकताच खासदार राजन विचारे यांनी मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त व स्थानिक आमदार गीता जैन यांच्यासोबत केली.

तत्पूर्वी खासदार राजन विचारे व आमदार गीता जैन यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब व पर्यावरण मंत्री आदित्यजी ठाकरे साहेब यांची भेट घेऊन पत्राद्वारे किल्ल्याच्या संवर्धनासाठी निधीची तरतूद करण्याची मागणी केली होती.

या मागणीच्या अनुषंगाने पर्यावरण मंत्री आदित्यजी ठाकरे साहेब यांनी सन २०२१-२२ च्या प्रादेशिक पर्यटन विकास योजने अंतर्गत १० कोटी निधीची मागणी मान्य केली आहे. त्याचबरोबर या किल्ल्याच्या संवर्धनासाठी नुकताच मिरा-भाईंदर महापालिकेच्या आर्थिक बजेटमध्ये महानगरपालिकेने ३ कोटीची तरतूद केलेली आहे. त्यामुळे समुद्राला लागून असणाऱ्या या किल्ल्याच्या संवर्धनासाठी एकूण १३ कोटीचा निधी उपलब्ध झाला आहे. त्यामुळे भाईंदर पश्चिमेकडील धारावी जंजिरे किल्ला हा पर्यटकांचा केंद्रबिंदू ठरणार आहे असे खासदार राजन विचारे यांनी म्हटले आहे. नुकताच १६ मार्च २०२२ रोजी ठाणे जिल्हा नियोजन अधिकारी यांनी मीरा भाईंदर महापालिकेस प्रस्ताव सादर करण्याचे पत्र सादर केले आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेने नियोजित आराखडा बनविण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे. लवकरच प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे खासदार राजन विचारे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब व आदित्यजी ठाकरे साहेब त्याचबरोबर ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे आभार मानले आहेत.

## द ग्रेट इंडियन ट्रॅव्हलने केला १९ हजार पेक्षा जास्त किलोमीटरचा प्रवास



### आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले कौतुक

पनवेल(प्रतिनिधी) द ग्रेट इंडियन ट्रॅव्हलने ०१ डिसेंबर २०२१ पासून ११ मार्च २०२२ पर्यंत देशातील सर्व राज्यांचा समावेश करून १९ हजार पेक्षा जास्त किलोमीटरचा प्रवास केला असून नुकताच या प्रवासाचा समारोप खारघर येथे पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी त्यांनी या मोहिमेचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, अनिता पाटील, नेत्रा पाटील, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, जिल्हा चिटणीस गीता चौधरी आदी उपस्थित होते.

द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल ही १०१ दिवसांची रोड ट्रिप मोहीम होती. जी कोविडमुळे प्रभावित झालेल्या लहान आणि सूक्ष्म व्यवसायांना मदत करण्यासाठी, सर्व भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये, भारत आणि तिची संस्कृती, परंपरा, रीतिरिवाज, पाककृती अशा विविध बाबतीत प्रेरक ठरली. या मोहिमेदरम्यान रोटरी क्लब, रोटरॅक्ट क्लब, एनजीओ क्षेत्र आणि स्टार्ट अप्स आणि लहान व्यावसायिक समुदायांसारख्या विविध आंतरराष्ट्रीय संस्थांमधील ८०० पेक्षा जास्त समविचारी लोकांच्या भेटी झाल्या व त्यामध्ये एकमेकांचे विचार मांडण्यात आले.

सपोर्ट युअर बिझनेस या आशयाच्या माध्यमातून सर्व पार्श्वभूमीतील लोकांना सक्षम करणे आणि त्यांच्यासाठी त्यांच्या व्यवसायाचा प्रचार आणि वाढ करण्यासाठी नेटवर्क स्थापन करण्याचे ध्येय आहे जे एक नेटवर्क प्लॅटफॉर्म आहे ज्याचे नेतृत्व तिचे संस्थापक संचालक रिंकी वनमोरे, सुश्री मदीहा शेख आणि कौस्तव घोष करतात. मोहिमेचे कारण लहान व्यवसायांना पाठिंबा देणे आणि त्यांचे ब्रँड आणि प्रयत्न ओळखणे हे असून द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल या मोहिमेमध्ये एक संघ असून त्यामध्ये कौस्तव घोष हे संस्थापक, लक्ष्मी सोरते सह-संस्थापक, आर्या नायर जनसंपर्क आणि विपणन, भाविक देशमुख नेव्हिगेटर, अनित कौर बंगा विचारवंत, संशोधन आणि विकास, रितांशू शर्मा मीटिंग समन्वयक, सावराब समता वेबसाइट विकसक, तरुण मिश्रा ग्राफिक डिझायनर/ व्हिडिओ मेकर, अभिषेक वाळेकर वाहन ब्रँडिंग, शीतल सिरसीकर वाहन ब्रँडिंग म्हणून काम पाहतात.

## भाजपा ओबीसी रायगड जिल्हा संघटना अध्यक्ष एकनाथ देशेकर यांच्या वाढदिवसानिमित्त करंबेली आदिवासीवाडीत धान्याचे वाटप

**...तर आज विविध कार्यक्रमाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन**

पनवेल - भारतीय जनता पक्षाचे ओ बी सी संघटनेचे अध्यक्ष एकनाथ देशेकर यांच्या वाढदिवसानिमित्त करंबेली आदिवासीवाडी येथे शनिवारी ( दि १९ ) जीवनावश्यक वस्तू व धान्याचे वाटप करण्यात आले. २० मार्च रोजी शंतीवन येथे जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. वाढिवसानिमित्त १४ ते २० मार्च दरम्यान ई श्रम कार्ड महानोंदनी अभियान सुरू करण्यात आले आहे. २० मार्च रोजी विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या भागात कंपनी विभाग असून येथे ९० टक्के कामगार कॉन्ट्रॅक्ट.मध्ये काम करत असून असंघटित आहेत. त्या कामगारांना केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेता यावा म्हणून एकनाथ देशेकर यांनी सात दिवस ई श्रम कार्ड महाअभियानाचे आयोजन केले आहे. असंघटित कामगारानो या आणि ई श्रम कार्डचा नोंदणी मोफत करून घ्या. आणि सरकार तर्फे मिळणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा असे आवाहन एकनाथ देशेकर यांनी केले आहे. या कार्डच्या माध्यमातून गरीब जनतेला याचा फायदा घेता येणार आहे अनेक व्यवसायासाठी शासनाकडून आर्थिक मदत होणार आहे.

## महिला मोर्चाच्यावतीने आज नविन पनवेलमध्ये 'हळदी कुंकू समारंभ' आणि 'चला खेळ खेळूया पैठणीचा' कार्यक्रम

जागतिक महिला दिनानिमित्त तालुका व शहर मंडल भाजपा महिला मोर्चावतीने रविवार दिनांक २० मार्च रोजी सायं. ५ वा. नविन पनवेल येथे 'हळदी कुंकू समारंभ' आणि 'चला खेळ खेळूया पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर सह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



हरहुन्नरी
उच्चविद्याविभूषित
कार्यतत्पर
प्रयोगशील
अभ्यासू
नगरसेवक

# आदर्श नगरसेवक

# विकास कृष्णा रेपाळे

## ज्येष्ठांची घरच्या माणसांसारखे काळजी घेणारा नगरसेवक ...

## एकच ध्यास जनमाणसाचा विकास




## विद्यार्थीदशेतच समाज सेवेकडे ओढा

सोमय्या कॉलेजमध्ये असताना तेथे जनरल सेक्रेटरी पदी निवड झाली आणि तेथे त्यांनी आपल्या अभ्यासपूर्वक कामाचा ठसा उमटवला व प्रकाशझोतात आले. त्यांची भारतीय विद्यार्थी सेना शहर चिटणीस पदी निवड झाली. त्यांनी इंजिनिअरिंग कॉलेज ची जबरदस्ती फी वाढ, विद्यार्थ्यांची केटी च्या माध्यमातून केलेली अडवणूक याविरुद्ध जबरदस्त आंदोलने केली व विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिला. त्याच प्रमाणे बोगस कॉलेज विरुद्ध स्वतःचा जीव धोक्यात घालून आंदोलने उभी केली.पोलिस तक्रारी दाखल केल्या व विद्यार्थ्यांना त्यांनी भरलेली फी त्यांना परत मिळवून दिली त्या बरोबरच अशी बोगस कॉलेज बंद करणे भाग पाडले. ही कामगिरी पाहून त्यांची महाराष्ट्र राज्य चिटणीस भारतीय विद्यार्थी सेना या पदी नियुक्ती करण्यात आली. हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांना ऑर्कुट नावाच्या सोशल मीडियावर धमकी आली होती. श्री विकास रेपाळे हे स्वतः इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन मधील पदविका धारक असल्याने त्यांनी संगणकाच्या माध्यमातून धमकी देणाऱ्या तरुणाचा शोध घेऊन स्वतः रुग्णालयात दाखल असताना डिस्चार्ज घेऊन पोलिस तक्रार दाखल करुन त्या तरुणाला अटक करण्यास भाग पाडून ही जबरदस्त कारवाई केली त्यावेळी वंदनीय शिवसेनाप्रमुखांनी श्री विकास रेपाळे यांचे जाहीर कौतुक केले होते. सन २००३ मध्ये ते पडवळ नगर मधून कशिश पार्क येथे राहायला आले त्यावेळी कशिश पार्क मध्ये पुरेसे पाणी नव्हते रात्रीच्या वेळेस रस्त्यावर पुरेसा उजेड नव्हता महिलांना संध्याकाळी त्या रस्त्यावरून जाणे मुश्कील होते तेथे श्री विकास रेपाळे यांनी लाईटची सोय केली. माननीय श्री एकनाथ शिंदे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली विविध आंदोलने केली तसेच कशिश पार्क च्या विविध समस्यांकडे, पाणी प्रश्नाकडे लक्ष देऊन नागरिकांना दिलासा मिळवून दिला. पाणी, वीज, इत्यादी समस्यांना कंटाळून जे नागरिक जागा विकून जाऊ लागले होते त्यांना थांबविले. लोकांना एकत्र आणण्यासाठी त्यांनी कशिश पार्क मध्ये शिवजयंती, गणेशोत्सव, तुळशी विवाह, दहीहंडी , माघी गणेश जयंती , महिला बचत गट स्थापनेकरिता विशेष आर्थिक सहकार्य , ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था असे विविध उपक्रम सुरु केले त्याचा अपेक्षित परिणाम दिसू लागला.

हिंदुह्रदय सम्राट वंदनीय श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांनी महानगरपालिकांच्या नगरपित्यांचे नगरसेवक म्हणून नव्याने नामकरण केले. अनेकांनी या नामकरणाला खऱ्या अर्थाने न्याय दिला.त्यात ठाण्यातील उच्चविद्याविभूषित कार्यसम्राट नगरसेवक श्री विकास कृष्णा रेपाळे यांचे नाव प्रथम श्रेणीत पहावयास मिळते. नगरसेवक कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री विकास रेपाळे.

कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेला हा धडपड्या तरुण. पण स्वर्गीय बाळासाहेबांवरील प्रामाणिक निष्ठा, गुरुतुल्य श्री धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या वर असलेली निस्सीम भक्ती आणि ज्यांना गुरूसमान मानतात असे मंत्री महोदय श्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे मार्गदर्शन, पाठबळ या जोरावर श्री शिंदे साहेबांनी जे जे काम सोपवले तेथे काम धडाक्याने करून दाखविले. ही कामाप्रती असलेली निष्ठा हे गुण वाखाणण्यासारखे आहेत.

२००८ साली मार्मिक मधून हिंदुहृदय सम्राट वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी श्री विकास रेपाळे यांचे नावानिशी नव्या पिढीतील शिवसैनिक कामाला लागले असे जाहीर रित्या कौतुक केले.

श्री विकास कृष्णा रेपाळे हे ठाण्यातील पडवळ नगर मधील तरुण. वडील, श्री कृष्णा रेपाळे हे कडवे शिवसैनिक. या व्यतिरिक्त कोणताही राजकीय वारसा नाही.

दरम्यान २००७च्या ठाणे महानगरपालिका निवडणुका आल्या . आदरणीय श्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी त्यांना कशिश पार्क मेंटल हॉस्पिटल वार्ड क्रमांक ८५ मधून उमेदवारी दिली. विभागात प्रभावी काम केलेले असून निसटता पराभव पत्करावा लागला पण नावात विकास असल्याने त्यांनी तो एकप्रकारे विजय मिळवला असे समजून कधी माननीय श्री शिंदे साहेब यांच्या माध्यमातून किंवा कधी स्वतःचे पैसे खर्च करून विकास कामे सुरूच ठेवली जनसेवेला वेळ कमी पडतो म्हणून टाटा टेलिसर्व्हिसेस मधील नोकरी सोडून स्वतःचा व्यवसाय सुरू केला मात्र समाजसेवेचे काम सुरूच ठेवले प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक खंबीर स्त्री उभी असते आणि त्याचा प्रत्यय सर्वांनी त्यांच्या सुविद्य पत्नी सौ रुपाली विकास रेपाळे यांच्या रूपाने पाहायला मिळतो. घर, अधिकारी पदावरील नोकरी सांभाळून समाजसेवेत विकास रेपाळे साहेबांच्या नेहमीच त्या पाठीशी राहिल्या. विकास रेपाळे यांच्याकरिता कशिष पार्क हे कुटुंब व प्रभाग परिवार कधी झाला हे कळलेच नाही कुटुंबांच्या प्रत्येक सुखदुःखात ते कायम सहभागी असतात दरम्यान २०१२ च्या निवडणुका आल्या परंतु वार्ड क्रमांक ३७ हा महिला आरक्षित असल्यामुळे आदरणीय श्री शिंदे साहेबांनी श्री विकास रेपाळे साहेबांच्या सहकारी सौ नम्रता भोसले जाधव यांना उमेदवारी दिली व निवडून आणण्याची जबाबदारी यशस्वीपणे साहेबांवर सोपवली व त्यांनी ती प्रभावीपणे पार पाडली. सौ नम्रता भोसले जाधव यांना विक्रमी मतांनी निवडून आणले व खऱ्या अर्थाने वैधानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून विकास कामांना सुरुवात झाली पाणी पुरवठा ,स्वच्छता ,आरोग्य, वृक्षारोपण, वृक्ष संगोपन, विद्यार्थी मदत, शाळेच्या इमारतीची देखभाल दुरुस्ती, आरोग्य केंद्राचे नूतनीकरण अशी कितीतरी विकास कामे मार्गी लागली. दरम्यानचे काळात शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांचे आशीर्वादाने व माननीय श्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे प्रयत्नाने श्री विकास रेपाळे साहेब यांची ठाणे महानगरपालिका स्वीकृत सदस्यपदी निवड झाली आणि विकास कामांची घोडदौड सुरू झाली त्याची यादी बनवली तर एक पुस्तक बनेल तरीसुद्धा काही कामांची नोंद घेणे नक्कीच गरजेचे आहे.

कशिश पार्कच्या तर सर्व अडचणी सोडविल्या कशिश पार्क चमकवले कशिश पार्क येथे महाराष्ट्र भूषण श्रीमान नानासाहेब धर्माधिकारी उद्यान व त्यातील सुशोभीकरण केले. श्री सिद्धिविनायक मंदिर एकेकाळी तेथे दिवसा विषारी साप फिरत असत पण आज ते ठिकाण एक प्रेक्षणीय स्थळ झाले असून भाविकांचे श्रद्धास्थान आहे .अनेक भाविक त्यांच्या मनोकामना श्री सिद्धिविनायक यांच्या कृपेने पूर्ण झाल्याचे सांगतात. नुकताच उद्यानाला जोडूनच भव्य असे आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्यान बांधण्यात आले असून विकास कामात तो एक शिरपेचातील तुरा आहे आत्ताच त्याचे लोकार्पण माननीय श्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या हस्ते झाले. ठाण्यातील नव्हे तर ठाण्याबाहेर नागरिकही उद्यानाला भेट देऊन श्री रेपाळे साहेब यांचे कौतुक करतात. कशिश पार्क व्यतिरिक्त विभागात ही त्यांनी प्रचंड कामे केली असून वार्ड मॅनेजमेंट नावाचा व्हाट्सअप ग्रुप स्थापन करून त्याद्वारे आलेल्या प्रत्येक तक्रारीचे निवारण त्वरित केले जाते शिवाय नागरिकांना काय हवे याचा शोध घेऊन विकास कामांना गती देणारे श्री विकास रेपाळे पहिलेच नगरसेवक असावे. २०१७ च्या निवडणुका हा प्रभाग निहाय झाल्या माननीय शिंदे साहेबांनी विकास रेपाळे यांना निशंकपणे उमेदवारी दिली आणि निवडून येऊन त्यांनी माननीय श्री शिंदे साहेबांचा विश्वास सार्थ ठरवला. उच्चविद्याविभूषित या नगरसेवकाला माननीय श्री शिंदे साहेबांनी ठाणे महानगरपालिका शिक्षण समिती सभापती पदी नियुक्त केले तेथे त्यांनी शाळांच्या दुरुस्त्या विद्यार्थ्यांसाठी सुख सुविधा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या अडचणी सोडवून दिलासा दिला सतत दोन वर्षे अध्यक्षपदाची धुरा त्यांनी सांभाळली .केवळ नागरी सुविधा नव्हे तर गरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन , शैक्षणिक मदत , गंभीर आजारात मदत , ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्येष्ठ नागरिक कट्टे, नाना नानी पार्क, ज्येष्ठ नागरिकांचे वेळोवेळी वैद्यकीय तपासणी शिबिरे ,जेष्ठ नागरिक अस्वस्थ झाल्यास घरच्यांची वाट न बघता खर्चाची पर्वा न करता त्यांना वैद्यकीय मदत करीत असतात ते नेहमी म्हणत असतात जेष्ठ नागरिक हे माझे बलस्थान आहे त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप, थंडीत कानटोप्या वाटप , दिवाळीत खाऊ वाटप असे सालाबाद चे कार्यक्रम सुरूच असतात विभागात एखाद्याकडे दुःखद प्रसंग घडला तर कुटुंबाला आधार देण्यासाठी सुरुवातीपासून शेवटपर्यंत सर्व व्यवस्था करून स्वतः थांबणारा नगरसेवक विरळाच पण श्री विकास रेपाळे साहेब अशा ठिकाणी स्वतः हजर असतात व नागरिकांना त्यांचा आधार वाटतो .

कोव्हीड-१९ ने जगभर हाहाकार माजला असताना आपल्याकडे ही २०२० मध्ये कोरोनाने धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. लागण झालेले रुग्ण वाढू लागले सन्माननीय पालक मंत्री नगर विकास व सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार श्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली टीम विकास रेपाळे सक्रिय झाली आणि नागरिकांना जीवनावश्यक वस्तू पासून ते औषधा पर्यंत सर्व घरपोच पोहोचवण्याची व्यवस्था झाली .

सोडियम हायपोक्लोराईटची फवारणी स्वखर्चाने अविरत सुरू ठेवली रोजचा लागणारा भाजीपाला दूध याची व्यवस्था केली प्रभागात रुग्ण सापडला तर त्याला रुग्णालयात भरती करण्यापासून तो बरा होऊन घरी येईपर्यंत पाठपुरावा करण्यासाठी झोकून दिले शेवटी व्हायचा तो परीणाम झाला त्यांनाही लागण झाली व तब्बल चोवीस दिवस रुग्णालयात काढावे लागले पण तेथेही शांत न राहता सौ नम्रता भोसले जाधव यांच्यावर टीमच्या कामाची जबाबदारी सोपवून कामावर रुग्णालयातून देखरेख सुरू ठेवली विचार एकच माझ्या प्रभागातील कोणत्याही नागरिकाला त्रास किंवा अडचणी निर्माण व्हायला नको रुग्णालयात असताना सुद्धा ज्येष्ठ नागरिकांची व्हिडिओ कॉन्फरन्स कॉलवर बोलल्यावर त्यांचे समाधान झाले असा ज्येष्ठांची घरच्या माणसांसारखे काळजी घेणारा नगरसेवक, रुग्णालयातून सुटल्यावरही आराम न करता प्रभागातील थांबलेली कामे व करून यात स्वतःला झोकून दिले. रात्री दोन वाजता ही रस्ते दुरुस्ती खड्डे बुजवणे या कामावर लक्ष ठेवून काम करून घेणारा हा नगरसेवक.

कामाचा धूमधडाका सुरू असतानाच परत आलेल्या दुसऱ्या कोरूनाच्या लाटेमध्ये साहेब स्वतः आजारी झाले तेव्हा सुद्धा दहा ते पंधरा दिवस हॉस्पिटलमध्ये काढावे लागले अशा वेळीसुद्धा व्हिडिओ कॉन्फरन्स आणि इतर माध्यमातून त्यांचे त्यांच्या टीमवर पूर्ण लक्ष होते आणि तसेच त्यांचे योग्य मार्गदर्शन सुरू होते पंधरा दिवसानंतर घरी आल्यावर मग कामाचा धुमधडाका परत सुरू झाला मध्यंतरीच्या काळात त्यांनी लसीकरणावर सुद्धा लक्ष केंद्रित केले प्रभागातील नागरिकांना लसीसाठी वणवण भटकावे लागू नये म्हणून त्यांनी विभागा विभागातून स्वयंसेवकांची नेमणूक करून १००% लसीकरण करून घेतले इतकेच नव्हे तर प्रभागाबाहेरील नागरिकांचीही लसीकरणासाठी मदत केली.

कोरोनासंदर्भातील सेवा सुविधा यांची कामे सुरू असतानाच प्रभागातील इतर कामे यांवर कुठलाही परिणाम होऊ दिला नाही वानगीदाखल म्हणायचे झाल्यास हजुरी मधील रस्ता रुंदीकरण हजुरी मधील रस्ता रुंदीकरण हे प्रलंबित प्रकरणे होते ज्या नागरिकांची घरे रस्ता रुंदीकरणाच्या कामात गेली आहेत अशांचे विस्थापन करणे अत्यावश्यक होते श्री विकास रेपाळे साहेब यांनी अभ्यासपूर्वक महानगरपालिकेतील उच्च अधिकारी यांच्याशी चर्चा करत हा हा प्रश्न चुटकीसरशी सोडवला व हजुरी मधील नागरिकांना त्यांचा हक्काचा निवारा मिळवून दिला व त्यायोगे हजूर येथील रस्ता रुंदीकरणाचा प्रकल्पही पूर्ण केला तसेच काही वर्षांपासून ज्येष्ठ नागरिक संस्था व समुपदेशन केंद्र हा प्रकल्प खूप दिवस साहेबांच्या मनात रेंगाळत होता त्यांनी ठाणे महानगरपालिकेच्या उच्च अधिकाऱ्यांशी कमिशनर साहेबांची वेळोवेळी भेट घेऊन हा हा प्रकल्प होणे किती गरजेचे आहे हे ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना समजावून सांगितले या सर्व सभांसाठी माननीय श्री एकनाथ शिंदे साहेब म्हणजेच ज्येष्ठांचे आधारवड यांचे प्रचंड असे मार्गदर्शन विकास साहेबांना लाभले शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाने आणि विकास साहेबांच्या जिद्दीने सरतेशेवटी ज्येष्ठ नागरिकांसाठी हक्काचे ठिकाण व समुपदेशन केंद्र जे सर्व सोयींनी युक्त आहे असे ठाण्यातील महानगरपालिकेच्या इमारतीत बनविले गेले ज्या ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन ज्येष्ठांचे आधारवड माननीय श्री शिंदे साहेब यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले ज्येष्ठ नागरिकांसाठी कॅरम बुद्धिबळ तसेच अनेक विषयांवरील जवळजवळ एक हजार नामांकित पुस्तके यांनी सुसज्ज असे ग्रंथालय असणारे हे ठाणे किंबहुना महाराष्ट्रातील एकमेव ज्येष्ठ नागरिक समुपदेशन केंद्र असेल सर्व शिवसैनिक शिवसेना शाखेला मंदिर मानतात तेथे कामासाठी आलेल्या नागरिकांचा सदैव राबता असतो त्या शाखेतील वातावरण प्रसन्न आनंददायी असावे म्हणून त्यांनी मेंटल हॉस्पिटल ते हाजूरी या परिसरातील पाच शाखांचे नूतनीकरण स्वखर्चाने केले आहे अशा या हरहुन्नरी उच्चविद्याविभूषित कार्यतत्पर प्रयोगशील अभ्यासू नगरसेवकाची सेवा इतर ठाणेकरांना ही मिळावी अशी नागरिकांची इच्छा दिसून येते ज्या प्रमाणे त्यांनी त्यांच्या प्रभागाला सेवा सुविधा सौंदर्याने नटवले तशाच सोयीसुविधा संपूर्ण ठाण्यात असाव्यात ही विभागा बाहेरील नागरिकांची इच्छा आहे असे ऐकण्यात येते अशा सेवेच्या ठायी तत्पर असलेल्या श्री विकास रेपाळे यांचा आज वाढदिवस त्यांना आरोग्यमय दीर्घायुष्य लाभो व त्यांच्या हातून समस्त ठाणेकरांची सेवा घडत राहो हीच श्री सिद्धिविनायक चरणी प्रार्थना...

**–श्री बलराम दत्तात्रय नाईक**
**कशिश पार्क ठाणे**




या हरहुन्नरी
उच्चविद्याविभूषित
कार्यतत्पर प्रयोगशील
अभ्यासू नगरसेवकाची
सेवा इतर ठाणेकरांना
ही मिळावी ...
हीच नागरिकांची
इच्छा....!

# ज्येष्ठांचे आधार...

कोव्हिड-१९ ने जगभर हाहाकार माजला असताना आपल्याकडे ही २०२० मध्ये कोरोनाने धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. लागण झालेले रुग्ण वाढू लागले सन्माननीय पालक मंत्री नगर विकास व सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार श्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली टीम विकास रेपाळे सक्रिय झाली आणि नागरिकांना जीवनावश्यक वस्तू पासून ते औषधा पर्यंत सर्व घरपोच पोहोचवण्याची व्यवस्था झाली .

सोडियम हायपोक्लोराईटची फवारणी स्वखर्चाने अविरत सुरू ठेवली रोजचा लागणारा भाजीपाला दूध याची व्यवस्था केली प्रभागात रुग्ण सापडला तर त्याला रुग्णालयात भरती करण्यापासून तो बरा होऊन घरी येईपर्यंत पाठपुरावा करण्यासाठी झोकून दिले शेवटी व्हायचा तो परीणाम झाला त्यांनाही लागण झाली व तब्बल चोवीस दिवस रुग्णालयात काढावे लागले पण तेथेही शांत न राहता सौ नम्रता भोसले जाधव यांच्यावर टीमच्या कामाची जबाबदारी सोपवून कामावर रुग्णालयातून देखरेख सुरू ठेवली विचार एकच माझ्या प्रभागातील कोणत्याही नागरिकाला त्रास किंवा अडचणी निर्माण व्हायला नको रुग्णालयात असताना सुद्धा ज्येष्ठ नागरिकांची व्हिडिओ कॉन्फरन्स कॉलवर बोलल्यावर त्यांचे समाधान झाले असा ज्येष्ठांची घरच्या माणसांसारखे काळजी घेणारा नगरसेवक, रुग्णालयातून सुटल्यावरही आराम न करता प्रभागातील थांबलेली कामे व करून यात स्वतःला झोकून दिले. रात्री दोन वाजता ही रस्ते दुरुस्ती खड्डे बुजवणे या कामावर लक्ष ठेवून काम करून घेणारा हा नगरसेवक.

कामाचा धूमधडाका सुरू असतानाच परत आलेल्या दुसऱ्या कोरूनाच्या लाटेमध्ये साहेब स्वतः आजारी झाले तेव्हा सुद्धा दहा ते पंधरा दिवस हॉस्पिटलमध्ये काढावे लागले अशा वेळीसुद्धा व्हिडिओ कॉन्फरन्स आणि इतर माध्यमातून त्यांचे त्यांच्या टीमवर पूर्ण लक्ष होते आणि तसेच त्यांचे योग्य मार्गदर्शन सुरू होते पंधरा दिवसानंतर घरी आल्यावर मग कामाचा धुमधडाका परत सुरू झाला मध्यंतरीच्या काळात त्यांनी लसीकरणावर सुद्धा लक्ष केंद्रित केले प्रभागातील नागरिकांना लसीसाठी वणवण भटकावे लागू नये म्हणून त्यांनी विभागा विभागातून स्वयंसेवकांची नेमणूक करून १००% लसीकरण करून घेतले इतकेच नव्हे तर प्रभागाबाहेरील नागरिकांचीही लसीकरणासाठी मदत केली.

कोरोनासंदर्भातील सेवा सुविधा यांची कामे सुरू असतानाच प्रभागातील इतर कामे यांवर कुठलाही परिणाम होऊ दिला नाही वानगीदाखल म्हणायचे झाल्यास हजुरी मधील रस्ता रुंदीकरण हजुरी मधील रस्ता रुंदीकरण हे प्रलंबित प्रकरणे होते ज्या नागरिकांची घरे रस्ता रुंदीकरणाच्या कामात गेली आहेत अशांचे विस्थापन करणे अत्यावश्यक होते श्री विकास रेपाळे साहेब यांनी अभ्यासपूर्वक महानगरपालिकेतील उच्च अधिकारी यांच्याशी चर्चा करत हा हा प्रश्न चुटकीसरशी सोडवला व हजुरी मधील नागरिकांना त्यांचा हक्काचा निवारा मिळवून दिला व त्यायोगे हजूर येथील रस्ता रुंदीकरणाचा प्रकल्पही पूर्ण केला तसेच काही वर्षांपासून ज्येष्ठ नागरिक संस्था व समुपदेशन केंद्र हा प्रकल्प खूप दिवस साहेबांच्या मनात रेंगाळत होता त्यांनी ठाणे महानगरपालिकेच्या उच्च अधिकाऱ्यांशी कमिशनर साहेबांची वेळोवेळी भेट घेऊन हा हा प्रकल्प होणे किती गरजेचे आहे हे ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना समजावून सांगितले या सर्व सभांसाठी माननीय श्री एकनाथ शिंदे साहेब म्हणजेच ज्येष्ठांचे आधारवड यांचे प्रचंड असे मार्गदर्शन विकास साहेबांना लाभले शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाने आणि विकास साहेबांच्या जिद्दीने सरतेशेवटी ज्येष्ठ नागरिकांसाठी हक्काचे ठिकाण व समुपदेशन केंद्र जे सर्व सोयींनी युक्त आहे असे ठाण्यातील महानगरपालिकेच्या इमारतीत बनविले गेले ज्या ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन ज्येष्ठांचे आधारवड माननीय श्री शिंदे साहेब यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले ज्येष्ठ नागरिकांसाठी कॅरम बुद्धिबळ तसेच अनेक विषयांवरील जवळजवळ एक हजार नामांकित पुस्तके यांनी सुसज्ज असे ग्रंथालय असणारे हे ठाणे किंबहुना महाराष्ट्रातील एकमेव ज्येष्ठ नागरिक समुपदेशन केंद्र असेल सर्व शिवसैनिक शिवसेना शाखेला मंदिर मानतात तेथे कामासाठी आलेल्या नागरिकांचा सदैव राबता असतो त्या शाखेतील वातावरण प्रसन्न आनंददायी असावे म्हणून त्यांनी मेंटल हॉस्पिटल ते हाजूरी या परिसरातील पाच शाखांचे नूतनीकरण स्वखर्चाने केले आहे अशा या हरहुन्नरी उच्चविद्याविभूषित कार्यतत्पर प्रयोगशील अभ्यासू नगरसेवकाची सेवा इतर ठाणेकरांना ही मिळावी अशी नागरिकांची इच्छा दिसून येते ज्या प्रमाणे त्यांनी त्यांच्या प्रभागाला सेवा सुविधा सौंदर्याने नटवले तशाच सोयीसुविधा संपूर्ण ठाण्यात असाव्यात ही विभागा बाहेरील नागरिकांची इच्छा आहे असे ऐकण्यात येते अशा सेवेच्या ठायी तत्पर असलेल्या श्री विकास रेपाळे यांचा आज वाढदिवस त्यांना आरोग्यमय दीर्घायुष्य लाभो व त्यांच्या हातून समस्त ठाणेकरांची सेवा घडत राहो हीच श्री सिद्धिविनायक चरणी प्रार्थना

– श्री बलराम दत्तात्रय नाईक, कशिश पार्क ठाणे

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140